| MHKO140000011981 | नियमित दिवाणी दावा क्र.३४/१९८१ मधील नि.क्र.३५७ वरील आदेश.<br>श्री. अंबाजी बसरगेकर व इतर.<br>वि.<br>श्री. ईश्वर गावडा व इतर. |
|---|---|

वादी यांनी सदर अर्ज वादी क्र.१/४ द्रोपदी रुक्माना मसुरकर या दि.१२/०६/२०२१ रोजी वृद्धापकाळाने मयत झाल्या असून त्यांचेविरुद्ध नियमानुसार झालेला अबेटमेंट आदेश रद्द करण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळणेकामी व वादी क्र.१/४ विरुद्ध झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल जोरदार हरकत घेवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०२. वादीच्या कथनानुसार, त्यांनी सदर दावा वाटप, कब्जा व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. वादी क्र.१/४ या दि. १२/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादी हे वयस्कर असून दुर्गम भागात राहण्यास आहेत. सदर मयत वादी यांचे वारस व इतर वादी यांच्यामध्ये संपर्क होऊ शकला नाही. वादी हे आडाणी असल्याने तसेच ते तालुक्यातील शेवटच्या भागता रहात असल्याने त्याबाबत त्यांना माहिती प्राप्त करुन वकिलांना देता आली नाही. तसेच कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे व दळण–वळणाची साधने ठप्प असल्याने वादीस वकिलांना भेटून न्यायालयात येता आले नाही. त्यामुळे नियमानुसार सदर वादी क्र.१/४ विरुद्ध दावा अबेट झाला असून वर नमुद कारणामुळे इतर वादी यांना अर्ज करण्यास विलंब झालेला आहे. सदर वारसांना प्रतिवादीविरु्दध दाव्यास कारण अस्तित्वात आहे. सदर अर्ज नामंजूर केलयास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल याउलट प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदर मयत वादी क्र.१/४ चे वारस अभिलेखावर येणे दावा गुणदोषावर

न्यायनिर्णयीत होणेकामी आवश्यक आहे. म्हणून त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादीच्या कथनानुसार वादी यांना वादी क्र.१/४ चे वारस फौलावर घेणेकामी अर्ज करण्यास अवाजवी विलंब झाला असल्याने त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. वादीने सदर दावा हा वाटप, ताबा व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. दाव्यातील नि.क्र.३६२ कडील यादी लगत दाखल असणारे वादी क्र.१/४ चे मृत्यू प्रमाणपत्र पाहता त्या दि.१२/०६/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येत आहे. वादी यांनी विहित मुदतीत मयत वादी क्र.१/४ यांचे वारस फौलावर घेतले नाहीत त्यामुळे त्याचे विरुद्ध दावा नियमानुसार अबेट झालेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता सदर वादी क्र.१/४ यांच्या वारसांना प्रतिवादी विरुद्ध दाव्यास कारण अस्तित्वात आहे. वादी यांच्या अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणामध्ये काही प्रमाणात तथ्य आढळुन येत आहे कारण दरम्यानचे कालावधीमध्ये कोरोना विषाणूच्या महामारीमुळे संपुर्ण भारत देशामध्ये लॉकडाऊन करण्यात आले होते तसेच शासकीय कार्यालये देखिल बंद होते. वादी यांनी सदर अर्ज दि.१६/०८/२०२२ रोजी दाखल केलेला आहे. महामारी नंतर सन २०२१ साली साधारणपणे सप्टेंबर महिन्यामध्ये लॉकडाऊन रद्ध करण्यात आले होते. त्यानंतर वादी यांना तात्काळ पुर्तता करता आली असती परंतू वादी यांनी ती केल्याचे दिसून येत नाही. न्यायाचे खातर सदर अर्ज मंजुर करुन झालेला विलंब माफ केल्यास दावा हा गुणदोषावर न्यायनिर्णयीत होणेकामी व पक्षकारांमध्ये विविध प्रकरणे दाखल होणार नाहीत तसेच संपुर्ण वादाचे एकाच दाव्यामध्ये निवारण होणेस मदत होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज काही रक्कम कॉस्ट म्हणून वादी वर थोपवून अर्ज मंजुर करणे न्यायोचित राहील. म्हणुन मी, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

०१. वादीचा अर्ज नि.क्र.३५७ रक्कम रुपये ५००/– कॉस्ट शासन जमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

०२. वादी यांना सदर अर्ज करण्यास झालेला विलंब तसेच मयत वादी क्र.१/४ याचे विरुद्ध झालेला अबेटमेंट आदेश वादी यांनी कॉस्ट रक्कम शासन जमा केल्यावर रद्द करण्यात येतो.

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.05.02 17:31:01 +0630

**ठिकाण–चंदगड** **(चारुदत्त उद्धव शिपकुले)**

**दिनांक – ०२.०५.२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,चंदगड.**